## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेवेतुन वाल्मिक शिरसाठ व जगन्नाथ चौधरी हे दोन कर्मचारी दि. ३१ जानेवारी रोजी निवृत्त झाल्याबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते त्यांच्या सेवेचा गौरव करण्यात आला.

वाल्मिक शिरसाठ हे विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रात सहायक म्हणून तर जगन्नाथ चौधरी हे वित्त विभागात शिपाई म्हणून कार्यरत होते. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांच्या हस्ते या दोघांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व पतपेढीच्यावतीने देखील सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.

### बातमी क्रमांक २

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्यावतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी : उच्च शिक्षणातील संधी आणि आव्हाने या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

दि. ३० जानेवारी रोजी झालेल्या या एक दिवसीय कार्यशाळेत डॉ. देविदास गोल्हार यांनी बीजभाषण केले. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, प्रा. एस. आर. कोल्हे, प्रा. एस. एस. राजपूत, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रशाळेच्या संचालिका डॉ. मधुलिका सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पवित्रा पाटील, प्रा. रमेश सरदार उपस्थित होते. या कार्यशाळेत ६५ शिक्षक सहभागी झाले. डॉ. आर. आर. चव्हाण यांनी समन्वयक म्हणून काम केले.

…………………………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी